मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २९५ सातारा शुक्रवार दि १२ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# कोणीही येड्या गबाळ्याने भाजपाची मापे काढू नयेत

## फोटो फेकायला ते बालबुद्धी नाहीत : धैर्यशीलदादा कदम

**सातारा :** भारतीय जनता पार्टी हा भारतातलाच नव्हे तर जगातला सगळ्यात मोठा पक्ष आहे, सगळे कार्यकर्ते आणि नेते मिळून मिसळून काम करत असतात, विरोधकांनी आपल्या लायकीत राहावे, आणि भाजपची मापे काढण्याचा प्रयत्न करू नये, फोटो फेकायला ते बालबुद्धी नाहीत असे भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. माण तालुक्यातील , एका ग्रामपंचायतीमधील, एक स्वयंघोषित नेता अनिल देसाई आम्हाला शहाणपणा शिकवत आहे , त्यांनी भाजप कार्यालय, खासदार उदयनराजे आणि आमदार जयकुमार गोरे यांच्याबद्दल काही चुकीची वक्तव्ये केली. आमदार गोरेंमुळे भाजप बदनाम झाली, आमदार गोरे यांनी खा. उदयनराजे भोसले यांना तिकिट मिळू नये म्हणून प्रयत्न केले आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी निवडून आल्यानंतर ज्यावेळी भाजप कार्यालयाला भेट दिली त्यावेळी आ. जयकुमार गोरे यांचा फोटो काढून फेकून दिला. या तिन्ही आरोपांत काहीही तथ्य नाही. ज्यांनी आरोप केला त्यांनी कोणत्या पक्षाची सुपारी घेतली हे जाहीर करावे. आमदार जयकुमार गोरे तीनवेळा आमदार झालेत. २०१९ च्या निवडणुकीत ज्यांनी त्यांच्यावर टिका केली, त्या



पत्रकार परिषदेत बोलताना भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, व इतर पदाधिकारी

सगळ्यांनी आमचं ठरलय म्हणून खच्चून विरोध केला.तरीही आमदार जयकुमार गोरे निवडून आले , त्यामुळे प्रसिद्धीसाठी काहीही शब्द तोंडातून काढणाऱ्या स्वयंघोषित नेत्याने , स्वतःला पडलेली मते आणि त्यांचा आवाका याचा अभ्यास करून नंतरच भारतीय जनता पार्टीला नावे ठेवावीत अन्यथा जिल्हा परिषद सोडाच त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये सुद्धा त्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही. खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे यांना सातारा लोकसभेच्या निवडणुकीची उमेदवारी मिळावी आणि ते निवडून यावेत यासाठी भारतीय जनता पार्टीच्या लहानात लहान कार्यकर्त्यापासून ते सर्व नेत्यांपर्यंत सर्वांनी एकत्र काम केले आणि भारतीय जनता पार्टीचा खासदार सातारा लोकसभेत पहिल्यांदा निवडून यावा यासाठी प्रयत्न केले .आमदार जयकुमार गोरे यांचा लोकसभा मतदारसंघ जरी माढा असला तरीही त्यांनी आपली पूर्ण ताकद श्रीमंत छत्रपती उदयन महाराज यांना उमेदवारी मिळावी आणि ते निवडून यावेत यासाठी लावली होती ,सातारा जिल्ह्यात उदयनराजे भोसले यांना तिकिट मिळणार हे सगळ्यांना माहीत होते. परंतु आता विधानसभा निवडणुका आल्यानंतर भा ज पा च्या नेत्यांमध्ये भांडणे लगवित म्हणून हे विरोधक असे आरोप करत आहेत. त्यामुळे त्यांच्या मागचा बोलविता धनी कोण आहे, याचा शोध घेणे गरजेचे आहे. भाजपाचा सामान्य कार्यकर्ता कुठेही अशा प्रकाराला थारा देणार नाही. उदयनराजे भोसले यांना निवडून आणण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने काम केले आहे. देसाई यांनी भा ज पा वर आरोप केले, त्यांनी भाजपच्या नेत्यांच्या अनेक वेळा मागे लागून पक्षाची पदे घेतली , परंतु संघटनेसाठी काही काम केले नाही , त्यांच्या घरातील सदस्य भारतीय जनता पार्टीच्या चिन्हावरच जिल्हा परिषदेवर निवडून आले आहेत , याची माहिती भारतीय जनता पार्टीचे सर्वसामान्य कार्यकर्त्याला सुद्धा आहे, त्यामुळे स्वतःचीच लाज वाटून त्यांनी विरोधी आघाडीत काम करायला सुरुवात केली, श्रीमंत छत्रपती उदयन महाराज यांना सुद्धा सर्व कार्यकर्त्यांची सर्व नेते मंडळींची पूर्ण माहिती आहे आणि सर्वजण पक्षासाठी एकत्र काम करतात याची त्यांना कल्पना आहे , उदयनराजे हे चौथ्या टर्मचे खासदार आहेत. ते राज्याचे आणि देशाचे नेतृत्व करतात. ते अशी बालबुद्धीची कृत्ये करणार नाहीत. लोकसभेतील विजयानंतर उदयनराजे भोसले यांचे भाजपच्या कार्यालयाजवळ आले. सर्व कार्यकर्त्यांनी स्वागत केले. त्या दिवशी महाराज कार्यालयात आलेच नाहीत. त्या दिवशी आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते जिल्हा कार्यालयात जल्लोष करून लाडू वाटप करण्यात आले, दुसऱ्या दिवशी श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचा सत्कार करायला आमदार गोरे जलमंदिरामध्ये गेले. श्रीमंत छत्रपती उदयनराजे यांच्या आडून देसाईंची भाजपावर वार करायची ही पद्धत अतीशय चुकीची आहे.

जिल्ह्यातील सर्व नेते भाजपाचे चिन्ह हेच आपला नेता मानून काम करतात. त्यामुळे कोणीही काही वल्गना केल्याने भाजपाच्या कार्यकर्त्यांवर फरक पडणार नाही. त्यांनी आधी ठरवावं की ते कोणत्या पक्षात आहेत. पातळी सोडून राजकारण करू नये व बोलू नये.

खोटे आरोप करणारे यांनी भाजपच्या नेत्यांच्या मागे लागूनच सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष पद मिळवले याचीही सर्वांनाच माहिती आहे

आमदर जयकुमार गोरे ज्यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष झाले, त्यावेळी त्यांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन केले. सध्याही कार्यालयाची त्यावेळचीच रचना असून यात काहीही बदल केलेला नाही. एक वर्ष त्यांना अध्यक्षपदाचा कार्यकाल मिळाला. या काळात त्यांनी जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांत पायाला भिंगरी लावून, सर्वसामान्यांना भाजपाकडे आकृष्ट करण्याचे काम केले. त्यांच्यामुळे जिल्ह्यात भाजपाचा दबदबा वाढला. त्यामुळे त्यांच्यामुळे कुठे बदनामी झाली असा सवाल त्यांनी कदम यांनी केला.

याचप्रमाणे जयकुमार गोरे यांनी उदयनराजेंच्या उमेदवारीस विरोध केला असा आरोप केला. हा आरोप करण्याचा त्यांना कोणताही नैतिक अधिकार नाही. ते पक्षाच्या कोणत्याही प्रक्रियेत नाहीत.

सातारा जिल्ह्यातील ,भारतीय जनता पार्टीचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे, आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार जयकुमार गोरे, माजी आमदार मदनदादा भोसले, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, प्रदेश सचिव भरतनाना पाटील, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्रजी पाटील, अतुल बाबा भोसले, मनोज दादा घोरपडे , सौ प्रियाताई शिंदे आणि सर्व पदाधिकारी कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीसाठी एकत्रित काम करत आहेत, असे असताना स्वतःचा ढोंगीपणा लपवण्यासाठी भारतीय जनता पार्टीवर आरोप करणे आणि खोट्या गोष्टी पसरवणे हे उद्योग खोटारड्या महाशयांनी बंद करावेत, अन्यथा त्यांना त्यांच्या ग्रामपंचायत मध्ये सुद्धा जागा दाखवण्याची तयारी भारतीय जनता पार्टीची आहे हे लक्षात ठेवावे असा इशारा भा ज पा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांनी दिला.

# चक्री उपोषण तीव्र करण्याचा इशारा

**मुंबई :** राज्यभरातील रुग्णालयात साफसफाई व रुग्णाची स्वच्छता करणाऱ्या महिला परिचर अवघ्या तीन हजार वेतनावर आठ काम करत आहेत. या अन्यायाविरोधात त्यांनी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आझाद मैदानात संभाजी सेनेच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रविकुमार सवडतकर यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत चक्री उपोषण सुरू केले आहे.

कायम सेवत करा व किमान वेतन, अपघात विमा, पेन्शन, भाऊबीज भेट, दरवर्षी गणवेश, कार्यक्षेत्रात प्रवासभत्ता या व इतर मागण्या सरकारकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत. मात्र सरकार आश्वासन देते मात्र अंमलबजावणी करत नाही असे सांगत महिला प्रदेश आघाडी कार्याध्यक्ष रेखा पाटील यांनी सरकारला आता हे चक्री उपोषण तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# जागा वाटपावरून महायुतीत होणार तू तू मैं मैं

## तब्बल १८० जागा लढविण्याचा भाजप नेत्यांचा प्रस्ताव

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १८० जागांवर निवडणूक लढवून स्वबळावर सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करावा, असा पक्षाच्या स्थानिक नेत्यांचा आग्रह असून तसा प्रस्ताव केंद्रीय नेतृत्वाकडे पाठविण्यात आला आहे. भाजपची ही मागणी मान्य झाल्यास शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यासह इतर मित्र पक्षांच्या पदरी काय पडणार हा प्रश्नच असून त्यामुळे जागा वाटपावरून महायुती तू तू मैं मैं होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाजपने मित्रपक्ष युती अन आघाडी यावर अवलंबून न राहता विधानसभेच्या १८० जागा लढवाव्या, अशी मागणी करणारा प्रस्ताव राज्यस्तरावरील पक्ष नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे पाठविला आहे. महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गटाचा धबधबा अधिक वाढत असल्याचा भाजपने त्यांचा सूर आहे. लोकसभा निवडणुकीत शिंदे गटाने दबाव तंत्र वापरून अधिक जागा पदरी पाडून घेतल्या, असा भाजप नेत्यांचा दावा आहे.

भाजपने १५० च्या जवळपास जागा लढविल्यास शंभर टक्के स्ट्राइक रेटने जागा निवडून आणणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत भाजपला पुन्हा सत्ता स्थापनेसाठी आणि ती टिकवण्यासाठी मित्र पक्षांच्या नाकदु ऱ्या काढाव्या लागणार आहेत. ही परिस्थिती टाळण्यासाठी पक्षाने १८० जागा लढवाव्या. शिंदे गटाला सत्तर जागा द्याव्या आणि उरलेल्या ५८ जागांमध्ये अजित पवार गट आणि इतर मित्र पक्षांना उमेदवारी द्यावी असे सूत्र भाजप नेत्यांनी सुचवले आहे. मात्र, हे जागा वाटप भाजपच्या मित्र पक्षांच्या पचनी पडणार का, हाच खरा सवाल आहे.

शिंदे गटाच्या नेत्यांनी यापूर्वीच १०० जागांची मागणी केली आहे. अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी तर लोकसभा निवडणुकीपूर्वीच विधानसभेच्या ८०-९० जागांची मागणी महायुतीकडे करून ठेवली आहे. अगदी महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाजवादी पक्षालाही शंभर जागांची अपेक्षा आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना महायुतीत येणार की नाही हे अद्याप गुलदस्त्यात असले तरीही ते आल्यास त्यांना किती जागा द्यायच्या, रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षाचीही काही मागणी असणार आहे. असा पेच महायुती समोर उभा राहणार आहे.

# सेवानिवृत व दिवंगत पोलिसांच्या घरांसाठी आंदोलन

**मुंबई :** सेवेत असतानाही त्रास व सेवानिवृत्ती नंतर तर जास्त त्रास सरकारकडून होत आहे. वेळोवेळी सरकार आश्वासन देते मात्र त्याची अंमलबजावणी करत नाही. त्यामुळे आम्ही आता आंदोलन करून आमच्या मागण्या मान्य करून घेऊ. असा इशारा सेवानिवृत्त पोलिसांच्या कुटुंबीयांनी आझाद मैदानात दिला आहे.

वरळी येथील पोलीस बी. डी. डी. चाळ क्रमांक ६४ ते ७४ व ७७ मधील सेवानिवृत व दिवंगत यांना सेवा ज्येष्ठते नुसार पहिल्या टप्प्यामध्ये घरे मिळावीत अशी मागणी करत करत सरकारच्या फसव्या घोषणा व आश्वासनांचा तीव्र प्रतिक्रिया देत निषेध व्यक्त केला.

वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री यांच्या सोबत झालेल्या बैठकीत असे ठरले होते की, वरळी बी. डी. डी. चाळी मध्ये राहत असलेल्या पोलीस रहिवाशांना ज्येष्ठ सेवा




निवृत्त व दिवंगत यांना सेवाज्येष्ठतेनुसार पहिल्या टप्प्यामध्ये घरे देऊ. म्हाडाला याबाबत सर्व माहिती व आदेश दिले असताना अद्यापही काहीच हालचाल झाली नाही. म्हणून नाईलाजास्तव आझाद मैदान येथे उपोषण व आंदोलन करण्यास बसावे लागत आहे असे आंदोलनकर्ते सांगत होते.

आता तरी सरकारने सहानभूतीपूर्वक विचार करून लॉटरी व करार त्वरित सुरू करावेत व उर्वरीत पोलीस रहिवाशांच्या दुसऱ्या टप्याकरिता लॉटरी काढून एकाच वेळी करारनामे करण्यास सुरूवात करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# स्टार लाइनर आम्हाला सुरक्षित पृथ्वीवर पोहोचवेल

## अंतराळवीरांनी व्यक्त केला विश्वास



**वॉशिंग्टन :** आम्ही अंतराळात सुरक्षित आहोत. स्टार लाइनर कॅप्सूल आम्हाला अंतराळातून पृथ्वीवर सुरक्षितपणे घेऊन येईल, असा विश्वास अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बॅरी विल्मोर यांनी व्यक्त केला. त्यामुळे त्यांच्या परतण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या चाहत्यांनी सुटकेचा विश्वास टाकला आहे. दूरदृश्य प्रणाली द्वारे पत्रकार परिषद घेऊन दोन्ही अंतराळवीरांनी पृथ्वीशी संपर्क साधला.

सुनीता विल्यम्स आणि बॅरी विल्मोर हे दोघे स्टार लाइनर कॅप्सूलद्वारे पाच जून रोजी अंतराळात झेपावले. दुसऱ्या दिवशी त्यांनी आयएसएस या अंतराळ स्थानकावर पाऊल ठेवले. या ठिकाणी ते आठ दिवस थांबून पुन्हा पृथ्वीवर परतणार होते. मात्र, अंतराळयानातील काही त्रुटींमुळे त्यांचा अंतराळातील मुक्काम अनिश्चित काळासाठी वाढला. विख्यात अंतराळ विज्ञान संस्था नासाकडून ते सुरक्षित असल्याची ग्वाही देण्यात येत असली तरीही त्यांच्या चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. पत्रकार परिषदेतून त्यांनी संपर्क साधल्यावर चाहत्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

मात्र, आपण नेमके कधी परतणार हे त्यांना सांगता आले नाही. अंतराळ प्रवासात स्टार लाइनरच्या २८ पैकी पाच विशिष्ट सुटे भाग बिघडले असून त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे.

या पत्रकार परिषदेत बोलताना सुनीता विल्यम्स यांनी त्यांचा अंतराळातील अविस्मरणीय अनुभव कथन केला. त्यांनी अंतराळातून छोट्या वादळाचे मोठ्या चक्रीवादळात रूपांतर होताना पाहिले. हा अनुभव फारच विलक्षण होता, असे त्यांनी नमूद केले.

# निवडणुकीनंतर महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता: शरद पवार



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्तापरिवर्तन अटळ असून महाविकास आघाडीच सत्ता हाती घेईल, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी केला आहे. एवढा दावा करून पवार थांबले नाहीत तर महायुतीला धूळ चारून महाविकास आघाडी या निवडणुकीत तब्बल २२५ जागांवर विजय प्राप्त करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लातूर जिल्ह्यातील माजी आमदार सुधाकर भालेराव आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी एका विशेष कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमात शरद पवार बोलत होते.

लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने चमकदार कामगिरी केली. पक्षाने १० जागांवर निवडणूक लढवून आठ जागांवर विजय प्राप्त केला. ही तर केवळ सुरुवात आहे. विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी तब्बल २२५ जागांवर विजय मिळवून महाविकास आघाडी राज्यात सत्तेवर येईल, असे पवार म्हणाले. शेतकरी, कामगार, शेतमजूर, व्यापारी अशा सर्व समाज घटकांना बरोबर घेऊन आपण राज्याचा विकास करणार आहोत, असेही पवार यांनी यावेळी सांगितले. ज्यांना जनतेने आणि पक्षाने मान दिला, मोठेपणा दिला त्यांनीच आमचा घात केला. मात्र, लोकसभा निवडणूक झाल्यापासून अनेक जण पुन्हा माघारी येत आहेत. राज्याचे चित्र बदलायचे असेल तर महाविकास आघाडीला पर्याय नाही, हे अनेकांना उमगू लागले आहे. त्यामुळे ते परत येत आहेत, अशा शब्दात पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही टोला लगावला.

# बीसीसीआय चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी देणार श्रीलंका आणि दुबईचा पर्याय

**मुंबई :** सुरक्षिततेच्या कारणासाठी भारतीय संघ पाकिस्तानच्या दौऱ्यावर जाणार नाही, या भूमिकेवर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ ठाम असून आगामी चॅम्पियन चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचे सामने दुबई किंवा श्रीलंका येथे खेळवले जावे, अशी सूचना नियामक मंडळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेला करू शकते, असे बीसीसीआयच्या वरिष्ठ सूत्रांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले आहे.

यावर्षी खेळवल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाने त्याचे वेळापत्रकही निश्चित करून ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेला सादर केले आहे. भारतीय संघाच्या सुरक्षेची हमी घेऊन त्या दृष्टीने भारताचे सर्व सामने लाहोर येथे खेळवण्याचे नियोजन पाकिस्तान क्रिकेट मंडळाने केले आहे. मात्र, भारताचा संघ पाकिस्तानात पाठवला जाणार नाही, अशी बीसीसीआयची ठाम भूमिका आहे.

भारत आणि पाकिस्तान या दोन देशांचे संबंध बहुतांश वेळा ताणलेले राहिले आहेत. भारतीय क्रिकेट संघाने सन २००८ नंतर पाकिस्तानचा दौरा केलेला नाही. यापूर्वी सन २०२३ मध्ये पाकिस्तानकडे यजमानपद असलेल्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्यास भारताने नकार दिला होता. त्यावर पर्याय म्हणून या स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन देशांमध्ये विभागून देण्यात आले.

## राज्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

# मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार




**मुंबई** : पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, १५व्या कृषी नेतृत्व समितीचा २०२४ चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुरस्कार राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.

१५ व्या कृषी नेतृत्व समितीच्या- २०२४ कॉंनक्लेव्हचे ग्रीकल्चर टुडे समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखाली १५व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास धोरणांची दखल दखल घेत महाराष्ट्राची सर्वोत्तम कृषी राज्य म्हणून निवड केली आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील कृषी विकासाच्या विविध योजना आणि शाश्वत विकासासाठीच्या प्रयत्नांची यावेळी माहिती दिली. महाराष्ट्र हे कृषी क्रांतीचे जनक राज्य आहे. महाराष्ट्राला हरित क्रांतीची समृद्ध परंपरा असून कृषी व शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची गौरवशाली परंपरा आहे. राज्याचा प्रमुख म्हणून हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद होत आहे. मी एक सामान्य शेतकरी कुटुंबातून आलो असून हा पुरस्कार स्वीकारताना मला मोठा अभिमान वाटतो. महाराष्ट्राला कृषी क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्याच्या रूपात निवडल्याबद्दल 'ग्रीकल्चर टुडे' आणि परीक्षक मंडळाचे आभार मानले, महाराष्ट्राला मिळालेला पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचे कष्ट, मेहनत आणि मातीच्या प्रेमाची ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारने त्यांच्या हितांसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले आहे, अशी माहिती यावेळी एकनाथ शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्रातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्सुक असून राज्यातील प्रगतीशील शेतकऱ्यांचा सन्मान केला जातो, जेणेकरून अधिकाधिक शेतकरी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करतील. बदलत्या काळानुसार आणि हवामानातील बदल पाहता, आमचा शेतकरी सदैव जागरूक आहे आणि त्यामुळेच महाराष्ट्र कृषी क्रांतीत अग्रेसर असल्याची माहिती शिंदे यांनी यावेळी दिली.

युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तापमान वाढीचे युग संपले असून, होरपळीचे युग सुरु झाल्याचे आणि तातडीच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्राने या आव्हानाला प्रतिसाद देत २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा आणि ५ टक्के बायोमास वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने जगातील मानव जात वाचवण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. राज्य शासनाने बांबू मिशनला प्राधान्य दिले असून, बांबू ही विशेष वनस्पती असल्याचे सांगत, बांबू पासून २००० प्रकारच्या वस्तू तयार होत आहेत. 'बांबू घास नही खास है' असे म्हणत बांबूमुळे पर्यावरण संवर्धन आणि अन्न सुरक्षा यावरही भर दिला जात असल्याचे श्री.शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी सहकार्य केलं आहे. तसेच, पीक विमा योजनेत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. लातूर जिल्ह्यात देशातील पहिला मायक्रो मिलेट क्लस्टर सुरू केला आहे आणि सिंचन प्रकल्पांद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचा ध्येय निश्चित केले आहे. राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचं ठरवले आहे आणि कपास व सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. राज्यातील कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी निर्णयांमुळे महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मिळाला आहे. यामध्ये मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढ, पीएम किसान सन्मान निधी दुप्पट, नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण, तृणधान्यांना एमएसपी, हरित पट्टा निर्माण आणि सिंचन क्षमता वाढ यांचा समावेश आहे.

## भाजपला पुन्हा धक्का! लातूरमधील 'या' नेत्याचा पक्षाला रामराम



**लातूर** : आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील राजकीय समीकरण बदलत आहे. त्यामुळे अनेक पक्षांतर देखील होताना दिसत आहे. मागील काही दिवसांपासून भाजपला अनेक धक्के बसत असून अनेकांनी महाविकास आघाडीचा रस्ता धरला आहे. दरम्यान, भाजपला उदगीरमध्ये मोठा धक्का बसला आहे. उदगीरचे माजी आमदार सुधाकर भालेराव यांनी भाजपला रामराम ठोकला आहे.

मागील अनेक दिवसांपासून माजी आमदार सुधाकर भालेराव हे भाजपची साथ सोडणार असल्याच्या चर्चा होत्या. आज अखेर त्यांनी आपला निर्णय जाहीर केला आहे. विशेष म्हणजे त्यांनी स्वतः भाजप कार्यालयामध्ये जाऊन भाजप पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. सुधाकर भालेराव हे उदगीर मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. आगामी विधानसभा निवडणूक लढवण्याची त्यांनी तयारी केली आहे. मात्र भाजपाकडून त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता कमी होती. त्यामुळे त्यांनी आधीच पक्षाची साथ सोडल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, भाजपसाठी सुधाकर भालेराव यांचा राजीनामा धक्का मानला जात आहे. सुधाकर भालेराव यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शरद पवार गटाची खेळी भाजपला महागात पडली आहे. उदगीरमधून शरद पवार गटाने सुधाकर भालेराव यांना उमेदवारी दिली तर त्यांच्याविरोधामध्ये भाजप कोणाला उमेदवारी देणार याची चर्चा राजकीय वर्तुळामध्ये रंगली आहे.

## दोंदे येथे विद्यार्थिनींना शाळेत मोफत एस. टी. पास वाटप

**राजगुरुनगर (वा.)** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या राजगुरुनगर आगाराच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाऊन मोफत पास वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थिनी मोफत पास योजनेअंतर्गत शाळेत ये-ज करण्यासाठी मोफत पास उपलब्ध करून दिले जातात. यावर्षीपासून मंडळाच्या वतीने शाळेत जाऊन मोफत पास वितरण करण्यात आले. दोंदे (ता. खेड) येथील भैरवनाथ विद्यालयातील ५१ मुलींना आगार व्यवस्थापक उज्वला कुटे, स्थानक प्रमुख तुकाराम पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रक गुलाब तिटकारे व मुख्याध्यापिका डॉ. नंदा भोर यांच्या हस्ते पास वितरण करण्यात आले. या मुली पानमंदवाडी, कडूस, रानमळा, वडगाव पाटोळे, चांडोली, राजगुरुनगर येथून शिक्षणासाठी दोंदे येथे येतात. विद्यार्थ्यांना ६६.६६ टक्के सवलतीत पाससुविधा उपलब्ध असून २० विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. विद्यालयातील लिपिक चंद्रकांत बो-हाडे यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## भारतीय अर्थव्यवस्थेत पायाभूत सुविधा क्षेत्रांचे भरीव योगदान प्रविण बिचे याचे विचार

**ऑबिटल सिनर्जी समिट २०२४ कार्यक्रम संपन्न**



**पुणे** : भारतीय अर्थव्यवस्थेत पायाभूत सुविधांचे योगदान खूप मोठे आहे. आगामी काळातही या क्षेत्रांच्या वाढत्या योगदानामुळे २०३४ या आर्थिक वर्षापर्यंत हे क्षेत्र लाखो कोटी डॉलर पर्यंत पोहचेल. सकल देशांतर्गत उत्पदानाच्या म्हणजेच जीडीपच्या तुलनेत १३.८ टक्के वृध्दी होईल. त्यामुळेच संबंधित सर्व छोट्या मोठ्या व्यवसायिकांना याचा खूप मोठा फायदा होईल. असे विचार ऑबिटल इलेक्ट्रोमेटचे व्यवस्थापकीय संचालक प्रविण बिचे यांनी व्यक्त केले.

समाजप्रती काही देणे असते ही भावना ठेऊन एमईपी इंजीनियरिंग ऑर्बिटल यांनी पुण्याच्या प्रतिष्ठित हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या 'ऑबिटल सिनर्जी समिट २०२४' कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी ऑर्बिटलच्या अध्यक्षा मंजिरी बिचे, संचालक सागर बावधनकर, निखिल तांबे, प्रकाश बिचे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच पुणे सहित संपूर्ण भारतातील जवळपास सर्व राज्यातील ३०० पेक्षा अधिक ऑर्बिटलशी अनेक वर्षे व्यावसायीक संबंध असलेल्या व्यक्ती उपस्थित होत्या.

## गौरीशंकर देगाव फार्मसीची कोमल थोरातचे प्रोजेक्ट स्पर्धेत यश

### डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरी कडून विशेष दखल, २०० प्रोजेक्ट मधून कोमल थोरातच्या शेतीविषयक प्रोजेक्टची निवड

**सातारा** : शेतीप्रधान भारत देशातील शेतकर्याचे जीवनमान समृद्ध करण्यासाठी आधुनिकतेची कास धरून शेती व्यवसाय केल्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव आता शेतकरी बांधवाना होवू लागली आहे. तोट्यातील शेती उद्योग फायदेशीर होण्यासाठी काळानुसार नविण्यपूर्ण यंत्रसामुगीचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे पांरपरिक शेती व्यसायला मूठमाती देवून स्पर्धाच्या युगात जलदगतीने शेतीमधील उत्पादन वाढविण्यासाठी स्वतामध्ये आता आमुलग्र बदलाची कास धरून वाटचाल करणे गरजेचे आहे शेतीउत्पादन क्षमतेत वाढ होण्यासाठी आधुनिक यंत्रसामुगी यंत्राच्या साहय्यानेच यापुढील काळात शेती करणे लाभदायक ठरणार आहे शेतकरी बांधवाची हि गरज ओळखून गौरीशंकरच्या सातारा कॉलेज ऑफ फार्मसी देगाव मधील तृतीय वर्षात शिकणारी कोमल रामचंद्र थोरात या विद्यार्थिनीने शेतकरी बांधवासाठी नविन्यपूर्ण यंत्र प्रोजेक्ट) टेन इन वन मल्टिपर्पज ॲग्री इझी मशीन विकसीत केले आहे. या यंत्राच्या सहय्याने शेतीमधील जवळपास विविध प्रकरचे दहा कामे करणे आता शेतकऱ्यांना सुलभ जाणार आहे. यामध्ये नागरणीपासून ते मळणीपर्यंत विशेषता पेरणी, कोळपणी खत फवारणी, माती भरणे काढणे तण काढणे व आंतरमशागत या यंत्राद्वारे सहजपणे करता येणार आहे .कमी वेळेत अधिक उत्पादन क्षमता घेण्याबरोबरच मनुष्यबळाचा वापर हि कमीत कमी होणार आहे या प्रोजेक्ट यंत्राची उपयुक्ततेची दखल डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरी यांनी घेतली आहे विद्यापीठात सादरीकरण केलेल्या २०० प्रोजेक्ट मधून कोमल रामचंद्र थोरात हिच्या प्रोजेक्टची निवड झाली तिने प्राप्त केलेल्या यशाबदल नुकताच तिचा सत्कार गौरीशंकरचे संचालक डॉ अनिरुद्ध जगताप यांच्या हस्ते करण्यात आला . यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नागेश अलूरकर,प्रा. स्पर्शी बांदेकर, प्रबंधक हेमंत काळे अदि प्रमुख उपस्थित होते . कोमल रामचंद्र थोरात हिला प्राचार्य डॉ. नागेश अलूरकर,प्रा. स्पर्शी बांदेकर यांनी मार्गदर्शन केले . यशस्वी विद्यार्थ्यांनीचे संस्थेचे अध्यक्ष मदनराव जगताप, उपाध्यक्ष मिलिंद जगताप ,संचालक जयवंतराव साळुंखे ,आप्पा राजगे,प्रशासकीय अधिकारी नितिन मुडलगीकर ,जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले .




कोमल थोरात हिचा सत्कार करताना डॉ.अनिरुद्ध जगताप ,डॉं.नागेश अलुरकर ,हेमंत काळे



## हरियाणा राज्याप्रमाने कंत्राटदार विरहीत रोजगार द्या

### वीज कंत्राटी कामगार आझाद मैदानात

**मुंबई** : वीज ऊद्योगातील कंत्राटदार हटवून हरियाणा राज्यातील पध्दती प्रमाणे कंत्राटदार विरहीत शास्वत रोजगार द्यावा व इतर मागण्या घेऊन महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघटनेने आझाद मैदानात आंदोलन सुरू केले आहे.

वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांचे महत्वपूर्ण प्रश्न शासन, प्रशासन स्तरावर गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, आम्ही कंत्राटी कामगार विविध सनदशीर मार्गाने आंदोलन करित आहोत मात्र अद्यापपर्यंत शासनाने कोणतेही दखल घेतली नसल्याने आझाद मैदानात आम्ही आंदोलन सुरू केले आहे. सरकारने जर याप्रकरणी गांभीर्याने दखल घेतली नाही तर हे आंदोलन तीव्र करणार असा इशारा संघटनेचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी दिला आहे.

विधीमंडळात या बाबतीत आमदारांनी विचारलेल्या प्रश्नांना सुध्दा वस्तुस्थिती न मांडता मुख्य मुद्दाच वगळला गेला.रिक्त पदांवर कार्यरत कंत्राटी कामगारांना वेतन वाढी बाबतीत वंचित ठेवले आहे. फक्त कायम कामगारांनाच वेतन वाढ घोषित करून कंत्राटी कामगारांची निराशाच केली आहे. या अगोदर आझाद मैदानावर लाक्षणिक निदर्शने केली होती. तेव्हाही सरकारला व वीज कंपनीला जाग आली नाही, त्यामुळे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ महाराष्ट्र राज्यात जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर आमरण उपोषण करत आहे असे अध्यक्ष निलेश खरात यांनी सांगितले.

वीज ऊद्योगातील कंत्राटदार हटवून हरियाणा राज्यातील पध्दतीने कंत्राटदार विरहीत शास्वत रोजगार द्यावा , कायम कामगारांच्या प्रमाणे वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांना जीवन वेतन प्रणाली प्रमाणे सन्मानजनक वेतनवाढ करावी, दोषी कंत्राटदार ब्लँक लिस्टमध्ये टाकून कारवाई करावी, आकसाने आणि सुडबुध्दीने नोकरी पासून वंचित असलेल्या कंत्राटी कामगारांना त्वरित कामावर रुजू करून घेण्यात यावे, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वीज कंत्राटी कामगारांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी अशी मागणी सचिन मेंगाळे यांनी यावेळी केली.

## मावळात जिल्हा परिषदेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा, घसरतोय

### तात्काळ उच्चस्तरीय चौकशी व्हावी-माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर यांची मागणी



**वडगाव मावळ** : मावळ तालुक्यातील नुकत्याच जाहीर झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालावरून

जिल्हा परिषदेच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा ढासळत चालला आहे या दुरवस्थेला शिक्षण विभाग जबाबदार असल्याने अधिकाऱ्यांचा शिक्षकांवर वचक न राहिल्याने कामचुकार शिक्षकांचे फावले असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा,घसरतोय यांची चौकशी तत्काळ उच्च स्तरीय चौकशी व्हावी व त्यावर कडक उपाय योजना करण्यात याव्यात.अशी मागणी माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर यांनी केली आहे

मावळ तालुका दुर्गम डोंगरी तालुका आहे. तालुक्यातील दुर्गम डोंगराळ भागातील नागरिक आपले पाल्य मोठया आशेने जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षणासाठी पाठवित आहे. कुटुंबाची आर्थिक स्थिती इतर बाबीच्या अडचणी असल्यामुळे ते आपल्या पाल्यास शहरात शिक्षणासाठी पाठवित नाही. ज्यांना शक्य आहे. ते आपल्या कुटुंबाच्या गरजा सिमित करून आपल्या पाल्यांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे.

नुकत्याच झालेल्या शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल पाहता संपुर्ण तालुक्यामधून जिल्हा परिषदेच्या शाळेतून उत्तीर्ण झालेले ३५ विद्यार्थी असून खाजगी शाळेचे २० विद्यार्थी आहे.

तालुक्यातील ६५ जिल्हा परिषद शाळांचा निकाल शुन्य टक्के

महत्वाची बाब म्हणजे जिल्हा परिषद शाळेचे १५ विद्यार्थी पैकी ०८ विद्यार्थी एकटया पिंपळोली, ता. मावळ, जि. पुणे या शाळेतील आहे. उर्वरित ०७ विद्यार्थी तालुक्यातील इतर शाळांमधील आहे. तालुक्यातील ६५ जिल्हा परिषद शाळांचा निकाल शुन्य टक्के लागलेला आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक कामगिरी ही दयनीय अवस्था पाहून भविष्य काळात जिल्हा परिषद शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होवू शकतो. जिल्हा परिषदेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा, घसरतोय यांची चौकशी तत्काळ उच्च स्तरीय चौकशी व्हावी व त्यावर कडक उपाय योजना करण्यात याव्यात.

अन्यथा तालुक्यातील डोंगराळ दुर्गम आदिवासी भागीतील मुले ही चांगल्या दर्जाच्या शिक्षणापासून वंचित राहतील व ती स्पर्धेच्या युगात टिकणार नाहीत ही एका दृष्टीने समाजाची हानिच आहे.

गेल्या तीन वर्षापासून लोकप्रतिनिधी नसल्याने शिक्षण विभाग स्थूल झालेला आहे. वेळोवेळी शाळांना भेट देवून शिक्षण विभागाच्या अधिका-यांकडून शैक्षणिक दर्जाची तपासणी होणे गरजेचे आहे. ते होत नसल्यामुळे कामचुकार शिक्षकांचे फावले आहे.

ज्या शाळांचा शुन्य टक्के निकाल लागला याची देखील चौकशी व्हावी जेणेकरून यापुढील काळामध्ये मावळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावेल या दृष्टीने कडक पावले उचलण्यात यावीत अशी मागणीचे पत्र माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर यांनी संबंधित शिक्षण विभागाला दिले आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सातार्‍यात फलाट बाकडे रिकामे,खड्ड्यात अपघाताचा धोका, बस प्रवाशी थेट रस्त्यावर



## सातारा बस स्थानकातील पलटवरील तुरळक गर्दी व रस्त्यावरील प्रवासी

**सातारा :** महाराष्ट्राची लाल परी म्हणजे खर्‍या अर्थाने वर्षभर वारी करणारी माऊली आहे. या माऊलीमुळे अनेकांना इच्छुक स्थळी तसेच देवदर्शन व चांगल्या शुभ कार्य व सहलीला जाण्यास मदत होत आहे. पण, सध्या सातारा बस स्थानकातील फलाट रिकामे व प्रवासी बस स्थानकाच्या बाहेर रस्त्यावर असे विदारक चित्र दिसत आहे. याबाबत माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अनेक चांगल्या सुविधा देऊन प्रवासी वर्गाला आकर्षित केलेले आहे. आराम बस, शिवशाही बस, शिवनेरी बस, साधी बस, तसेच विना थांबा विना वाहक बस, पार्सल बस अशा अनेक सुविधा निर्माण केलेले आहेत. सध्या सातारा बस स्थानकावर सातारा जिल्हा, पुणे-मुंबई व परराज्यात जाणार्‍यांसाठी आठ फलाट आहेत. या फलाटावर प्रवाशांनी बसून एसटी बसची वाट पहावी असे संकेत आहेत. परंतु, सध्या वाढती गर्दी असली तरी सातारा बस स्थानकातील फलाटावर तुरळक गर्दी प्रवाशांचे असते. त्याच्यापेक्षा चार पट गर्दी ही बस स्थानकाच्या आवारात बस ये- जा करणार्‍या रस्त्यावर असते. त्यामुळे अनेक बस चालकांना बस पुढे- मागे घेऊन जाताना काळजीपूर्वक बस घेऊन जावे लागत आहे. दुर्दैवाने एखादा अपघात घडल्यास बस चालकालाच दोष दिला जातो. प्रवासी सुद्धा आता प्रवाशांच्या सेवेसाठी असलेली बस पकडण्यासाठी जीवाची आटापिटा करत आहेत. याचा सुद्धा आता सर्वांनीच आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. सातारा बस स्थानकातून दररोज पाच ते दहा हजार प्रवासी असतात. यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. सुट्टीच्या दिवशी जरी जास्त गर्दी दिसत नसली तरी इतर वेळी मात्र खूपच गर्दी असते. विद्यार्थी व विद्यार्थिनी बस पकडण्यासाठी चक्क रस्त्यावर इच्छुक स्थळी जाणारी बस कुठे लागते? हे माहीत असल्यामुळे त्या बसला गराडा घालून चालकाचे मन विचलित करतात. ही सुद्धा बाब पुढे आलेली आहे.

या सर्व गोष्टीचा विचार करून मोकाट जनावरे, प्राणी व फुकट शंभू व रिकामटेकडे बस स्थानकात येत असतील तर त्यांच्यावर तातडीने कडक कारवाई करावी. अशी मागणी आता प्रवाशांनी केलेली आहे.

एसटी महामंडळ डब्र्यात जायची वेळ आली असताना शासनाने विविध सवलती जाहीर करून कुठं तरी बुडत्याला काडीचा आधार दिला.

मात्र सातार्‍यात एसटी स्टॅण्ड परिसरातील खड्ड्यात कधी कोणाचा जीव जाईल हे सांगता येत नाही. संबधित बांधकाम विभागाचे व एसटीच्या विभाग नियंत्रणाचा कारभार म्हणजे दिव्याखाली अंधार असा दिसून आल्याने. वर्षभरात फक्त एसटी महामंडळात झालेल्या अपघातात मृत्यू मुखी पडलेल्यांची संख्या लक्षात आल्याने भिविष्यात त्याचा विसर पडलेल्या असंवेदनशील अधिकारी,कर्मचारी,यांच्यावर मनुष्यवधाचे गुन्हे दाखल झाल्यावर त्यांना जाग येईल का असा प्रश्न सर्वसामान्य प्रवासी विचारत आहेत.

# प्रशासनाच्या बैठकीवर संभाजीराजेंचा बहिष्कार

**कोल्हापूर :** विशाळगडावरील अतिक्रमण हटवण्यासाठी १४ जुलैला हजारो शिवभक्तांसह माजी खासदार संभाजीराजे विशाळगडावर जाणार आहेत. यावेळी शिवभक्त खूपच आक्रमक झाले आहेत. यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये त्यासाठी प्रशासनाने बैठक बोलावली होती. मात्र या बैठकीवर माजी खासदार संभाजीराजेंनी बहिष्कार टाकल्याचं पत्राद्वारे जाहीर केले आहे.

प्रशासनाच्या अशा बैठका आणि प्रतिबैठकांचे खेळ याआधी आम्ही पाहिलेले आहेत. आता बैठकांचा दिखावा नको तर प्रत्यक्ष कार्यवाही करा, हीच शिवभक्तांची मागणी आहे.

त्यामुळे या दिखाऊ बैठकीवर आम्ही बहिष्कार टाकत असल्याचं संभाजीराजेंनी पत्रात म्हटलय.

ज्या विशाळगडाने छत्रपती शिवाजी महाराजांचे रक्षण केले, स्वराज्याचे रक्षण केले अशा ऐतिहासिक प्रेरणास्थळाला वंदन करण्यासाठी विशाळगडावर जाणे हा आमचा,सर्व शिवभक्तांचा अधिकार आहे.

शासन - प्रशासन व इतर कुणीही शिवभक्तांना अडविण्याची चूक करू नये. प्रशासनास आम्ही इशारा देऊ इच्छितो, अजूनही तीन दिवस राहिलेले आहेत. बैठकांचा खेळ दाखविण्यापेक्षा कारवाईची धमक दाखवा, असंही त्यांनी नमूद करण्यात आले आहे.

# लाडकी बहीण योजनेबद्दल शरद पवार साशंक

## वाघ नख्याबद्दल इतिहास तज्ञाचे मत लक्षात घेणे जरुरी असल्याचे सूतोवाच

**सातारा :** लाडकी बहीण या महाराष्ट्र शासनाच्या योजनेबाबत व तिच्या यशस्वीतेबद्दलही शरद पवार यांनी सातार्‍यात शंका उपस्थित केली. तसेच लंडनच्या म्युझियममधून सातार्‍यात वाघनख्या येत आहेत आणि त्यावरून त्या खर्‍या की खोट्या असा वाद सुरू आहे याबाबत प्रश्न विचारून पत्रकारांनी छेडले असता शरद पवार म्हणाले की इंद्रजीत सावंत यांनी मांडलेले मुद्दे त्यांच्या अभ्यासाने मांडलेले आहेत. ते इतिहासाचे अभ्यासक आहेत. त्यांचे इतिहासामध्ये योगदान आहे. मी काही इतिहासतज्ञ नाही आणि जाणकारही नाही त्यामुळे मी या बाबतीत लक्ष दिले नसल्याचे सूचक वक्तव्य शरद पवार यांनी सातारा पत्रकार परिषदेत केले. देशातील सामान्य जनतेने भारतीय जनता पक्षाचे सर्व मनसुबे लोकसभा निवडणुकीत धुळीस मिळवलेले आहेत. उद्याच्या येऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत सामान्य जनता पुन्हा एकदा त्यांना त्यांची जागा दाखवेल असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खा शरद पवार यांनी सातारा जवळील जकातवाडी येथे पत्रकारांशी बोलताना केला.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, महिलांसाठी मांडलेली ही योजना कितपत यशस्वी होते हे अर्ज दाखल

करण्याच्या प्रक्रियेवरून दिसून येते. एकदा अंदाजपत्रक मांडल्यानंतर त्यात बदल हे पुरवणी अंदाजपत्रकात केले जातात.परंतु येथे तर आठ दिवसात त्यात बदल सुचवले जाऊ लागले आहेत. अर्थकारण आणि राजकारण या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. अंदाजपत्रकात राज्य सरकारने

अर्थकारणाची बाब नीटशी विचारात घेतली नसल्याचे दिसते. मुलींचे शिक्षण मोफत देण्याचा मुद्दा ही जाहीर केला आहे. परंतु दुसर्‍या बाजूला शैक्षणिक संस्थांची स्थिती काय आहे शिक्षण संस्थांचे दोन दोन वर्षाचे अनुदान अजून सरकारने दिलेले नाही. समाजकार्य महाविद्यालयासारख्या या लहानशा संस्थेला अनुदान द्यायला सरकारला वेळ नाही तर सरकारने सबंध राज्यात मुलींच्या शिक्षणाच्या गोष्टी जाहीर केल्यात. बघुयात काय करतात ते असेही शरद पवार म्हणाले.

जकातवाडी येथील भारतीय भटके विमुक्त व विकास संशोधन संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अध्यक्ष म्हणून ते उपस्थित होते. वार्षिक सभा झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना शरद पवार यांनी भाजपाचे मनसुबे सामान्य जनता धुळीस मिळणार असा दावा केला. यावेळी माजी खासदार श्रीनिवास पाटील माजी आमदार लक्ष्मण माने राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनील माने उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४०० पार चा नारा दिला होता त्यांना वाटत होते की फक्त तेच एकटे राष्ट्रहिताची भूमिका घेतात. परंतु त्यांची भाषणे पाहिली असता ती जातीय तेढ निर्माण करणारी आणि धार्मिक भावना भडकवणारी होती. कुठेतरी दंगे व्हावेत आणि सामान्य जनतेच्या मनात दहशत निर्माण व्हावी आणि निवडणुका जिंकाव्यात ही सुप्त खेळी होती. परंतु या देशातील सामान्य माणूस आम्हा राजकारण्यांपेक्षा खूप शहाणा आहे. त्यामुळे देशाच्या घटने विरोधात जाऊन अतिरेकीपणाने निवडणुकांमध्ये जाण्याचा त्यांचा झालेला प्रयत्न मतदारांनी हाणून पाडला असेही खा शरद पवार म्हणाले.

# पर्यटनस्थळांवर सुरक्षिततेच्या आवश्यक त्या उपाययोजना करा

## आ. शिवेंद्रसिंहराजे; स्थानिकांचा व्यवसाय सुरु राहील याची काळजी घेण्याच्या सूचना

**सातारा :** सातारा आणि जावली तालुक्यात दरवर्षी पावसाळी पर्यटन बहरत असते. भांबावली, वजराई, ठोसेघर आदी धबधबे पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत असते मात्र, हुल्लडबाजी, गोंधळ आणि सातत्याने दुर्घटना घडत असल्याने अशा पर्यटनस्थळी पर्यटनास बंदी करण्यात आली आहे. त्याचा विपरीत परिणाम म्हणजे स्थानिकांचा व्यवसाय, रोजगार धोक्यात आला आहे. स्थानिकांची रोजीरोटी सुरु राहावी यासाठी पर्यटनही सुरु राहणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वच पर्यटनस्थळांवर पर्यटकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करा, अशा सूचना आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रशासनाला केल्या आहेत.



आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या सूचनेनुसार प्रांताधिकारी सुधाकर भोसले यांच्या अध्यक्षतेखाली महत्वाची बैठक घेण्यात आली असून पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असणार्‍या उपाययोजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासांदर्भात झालेल्या बैठकीस तहसीलदार नागेश गायकवाड यांच्यासह महसूल, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन आदी सर्वच विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. सातारा आणि जावली तालुक्यातील विविध पर्यटनस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याची पाहणी करण्यात येणार आहे. आवश्यक ठिकाणी बॅरिकेट्स, सुरक्षा कठडे बांधणे तसेच सर्व पर्यटनस्थळी सुरक्षा रक्षक तैनात ठेवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. पर्यटनस्थळी हुल्लडबाजी, गोंधळ होऊ नये आणि कोणतीही दुर्घटना, अनुचित प्रकार घडू नये, पर्यटकांना सुरक्षितपणे पर्यटनाचा आनंद घेता यावा, याची काळजी प्रशासनाने घ्यावी. पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी बंद केल्यास स्थानिकांचा व्यवसाय, रोजगार ठप्प होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ शकते. त्यामुळे पर्यटकांसाठी सुरक्षित पर्यटन व्यवस्था करून पर्यटन विना दुर्घटना सुरु राहिले पाहिजे, याची खबरदारी घेण्याच्या सक्त सूचना आ. शिवेंद्रसिंहराजेंनी प्रांताधिकारी भोसले यांनी केल्या आहेत. त्यानुसार प्रशासनाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, पर्यटन हे आनंद घेण्यासाठी आहे, आपला जीव घालवण्यासाठी नाही, याची दक्षता प्रत्येकाने घेतली पाहिजे. हुल्लडबाजी, गोंधळ किंवा कोणताही अनुचित प्रकार न करता पर्यटकांनी निसर्गसौंदर्याचा आनंद घेतला पाहिजे. त्यामुळे पर्यटकांनीही हुल्लडबाजी, गोंधळ न करता, आपल्या सुरक्षिततेचे, आपले जीवन अनमोल आहे याचे भान ठेवावे, असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजेंनी केले आहे.

# खटाव तालुक्यातील रस्त्यासाठी अर्थसंकल्पात ५२.५० कोटींचा निधी मंजूर

## गायत्रीदेवी यांच्या प्रयत्नाला यश

**औंध :** २०२४ च्या पुरवणी अर्थसंकल्पात राज्यातील महायुती शासनाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून आणि सातारा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने खटाव तालुक्यातील विविध विकास कामासाठी ५२ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस हणमंतराव शिंदे यांनी दिली.

अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या कामाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते यावेळी औंध शिक्षण मंडळाचे विश्वस्त राजेंद्र माने,माजी सरपंच सोनाली मिठारी,दीपक नलवडे, गणेश देशमुख, आब्बास आत्तार, अनिल माने, तानाजी इंगळे उपस्थित होते.



वडी ते गणेशवाडी रस्त्याची सुधारणा करणे २ कोटी, गणेशवाडी ते औंध रस्त्याची सुधारणा करणे २.५० कोटी,नांदोशी ते औंध रस्त्याची सुधारणा करणे ७कोटी, , नांदोशी ते औंध रस्त्यावरील औंध हद्दीवरील प्रवेशद्वार सुधारणा करणे २.५० कोटी,औंध ते माने वस्ती रस्त्याची सुधारणा करणे १.५० कोटी,निमवस्ती ते निकमवस्ती रस्त्यावर लहान पूल बांधणे १कोटी, , औंध खबालवाडी रस्ता सुधारणा लहान पुल बांधणे २.५० कोटी,विजय पवार ते फलटण रस्ता काँक्रीटीकरण करणे१कोटी,औंध गोसाव्याचीवाडी कुमठे रस्त्याची सुधारणा करणे २ कोटी,कुमठे ते गंजीबा मळा रस्त्याची सुधारणा करणे १कोटी,खरशिंगे-सुर्यवंशीवस्ती ते घाडगेवस्ती रस्त्याची सुधारणा करणे १कोटी,खरशिंगे ते गोसाव्याचीवाडी रस्त्याची सुधारणा करणे १.५० कोटी, जायगाव ते माळवस्ती रस्त्याची सुधारणा करणे १कोटी, जायगाव ते जयरामवस्ती रस्त्याची सुधारणा करणे ७५ लाख, गुरसाळे ते आंब्याचा मळा रस्त्याची सुधारणा करणे१, गुरसाळे ते गादेवस्ती ७५ लाख,लोणी ते वरुड रस्त्याची सुधारणा करणे ५० लाख,लोणी ते भोसरे रस्त्याची सुधारणा करणे ५० लाख, औंध मूळपीठ मंदिरालगत संरक्षक भिंत बांधणे २. ५० कोटी, लोणी ते धकटवाडी रस्त्याची सुधारणा करणे ५० लक्ष, नढवळ ते काळेवाडीरस्त्याची सुधारणा करणे १ कोटी, पुजारवाडी ते उंबर्डे रस्त्याची सुधारणा करणे १,उंबर्डे ते कुमठे रस्त्याची सुधारणा करणे५०, बाळूबाई मंदीर ते उंबर्डेफाटा रस्त्याची सुधारणा करणे ५० लक्ष, २.५० कोटी, औंध फलटण चौक ते माकारवस्ती आरसीसी गटर बांधणे २.५० कोटी आदी विकास कामांना मंजुरी मिळाली आहे.

# मराठा - ओबीसी वाद न होता मराठा समाजाला आरक्षण द्या : केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले

**पुणे :** लोकसभा निवडणुकीत रिपबल्किन पार्टी ऑफ इंडियाला जागा मिळाल्या नाहीत, तरीही आम्ही नाराजी दूर ठेवून महायुतीचे काम केले,. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणूकीत किमान १० ते १२ जागा आम्हाला मिळाव्यात, तसेच ओबीसी आणि मराठा समाजात वाद निर्माण न होता मराठ्यांनाही आरक्षणाचा लाभ मिळावा तसेच क्रिमिलेयरची मर्यादादेखील ८ लाखांवरुन १२ लाख रुपये करावी अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.

पुण्यात शासकीय विश्रागृहात आयोजित पत्रकार परिषदेत रामदास आठवले बोलत होते. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, राज्य संघटक परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, बाळासाहेब जानराव, महेंद्र कांबळे, आयूब शेख, श्रीकांत कदम, श्रमिक ब्रिगेडचे सतीश केदारी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, लोकसभेत आमच्या पक्षाला दोन जागा मिळणे अपेक्षित होते पण तसे झाले नाही तरी नाराजी दूर ठेवून आम्ही कामाला लागलो. आम्ही देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन आरपीआयला एक एमएलसी मिळावी अशी विनंती केली होती. आगामी मंत्रीमंडळ विस्तारात आमचा समावेश व्हावा अशी आमची मागणी आहे, विधासभा निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला १२ जागा मिळाव्यात अशी आमची मागणी आहे. आमच्या कार्यकर्त्यांचा सन्मान व्हावा, राज्यस्तरावर आणि जिल्हा तसेच तालुकास्तरावर ज्या समित्या आहेत तिथे आम्हाला संधी मिळावी. महामडळांच्याही नियुक्त्या कराव्यात अशी आमची मागणी आहे.

विधानसभेत महायुतीला १७० ते २०० जागा मिळतील असेही त्यांनी नमूद केले. संविधानाचा मुद्दा या निवडणूकीत चालणार नाही. लोकसभेच्या निवडणूकीत मात्र मोठा गैरसमज निर्माण करुन विरोधकांनी दलित आणि अल्पसंख्यांकमध्ये संभ्रम निर्माण करुन मते घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांना यश आले नाही.


ओबीसी आणि मराठा आरक्षणाबाबत बोलताना आठवले म्हणाले की, माझं दोन्ही समाजांना आवाहन आहे की, भांडण न करता आपला हक्क मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे, १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, पण मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यासंदर्भात राज्य सरकारने पुन्हा विचार करावा. तामिळनाडूमध्ये ५० टक्के ओबीसीच्या दोन कॅटेगरी आहेत ३० टक्केचा एक आणि २० टक्केचा दूसरा गट आहे. त्या पद्धतीने मराठा समाजाला राज्य सरकारने आरक्षण देण्याचा प्रयत्न करावा. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये, पण मराठ्यांनाही आरक्षण मिळाले पाहिजे. राज्य सरकारने प्रस्ताव पाठवला तर आमचं मंत्रालय त्यावर विचार करेल. ज्या मराठ्यांचे उत्पन्न ८ लाखांच्या आत आहे, त्यांनाच ते मिळेल, सर्वच ओबीसींनी देखील आरक्षण मिळत नाही ज्यांचे उत्पन्न ८ लाख आहे त्यांनाच मिळत आहे. ८ लाखांची मर्यादा १२ लाखांपर्यंत वाढवावी अशी आमची मागणी आहे. त्याचा विचार भारत सरकारकडून सुरु आहे, असे आठवले म्हणाले.

उत्तर प्रदेशातील हाथरस सत्संग प्रकरणावर बोलताना आठवले म्हणाले, की, मी परवा हाथरसला जाऊन आलो. हाथरसमध्ये १२१ लोकांचे अंधश्रद्धेमुळे प्राण गेले. यात महिलांची संख्या मोठी आहे. त्यात दलित समाजाचे लोक जास्त आहेत, दलित समाज मोठ्या प्रमाणात त्या सत्संगाला जायचा. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रातील औरंगाबादचेही काही लोक सत्संगाला होते. ज्या कुटुंबातील लोकांचे जीव गेलेत त्या कुटुंबातील एक जणाला तरी नोकरी मिळावी यासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पत्र लिहिणार आहे, असेही त्यांनी सांगितले. तसेच समाजाने अंधश्रद्धेमध्ये न अडकता विज्ञानवादी दृष्टिकोन अवलंबवून आपली प्रगती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मत आठवले यांनी व्यक्त केले.

# महाराष्ट्र विधानपरिषदेत आता एकही मुस्लीम आमदार नाही

## राज्याच्या इतिहासातील पहिलीच वेळ!

**मुंबई :** महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील काही आमदारांचा कार्यकाळ दोन आठवड्यांपूर्वी संपला. यामध्ये मुस्लीम समाजातून येणार्‍या बाबाजानी दुर्राणी आणि मिर्झा वजाहत या दोन आमदारांचाही समावेश होता. या दोघांच्या निवृत्तीने विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह असलेल्या विधान परिषदेतील मुस्लीमआमदारांची संख्या शून्यावर आली आहे. राज्याच्या वरिष्ठ सभागृहात एकही मुस्लीम आमदार नसण्याचीही महाराष्ट्र विधानपरिषदेच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे. तसंच उद्या होत असलेल्या विधानपरिषदेच्या ११ जागांसाठीच्या निवडणुकीतही एकही मुस्लीम उमेदवार मैदानात नाही. त्यामुळे पुढील काही महिनेतरी हेच चित्र कायम राहण्याची शक्यता आहे. विधानपरिषद सभागृहातील मुस्लीम समाजाचे प्रतिनिधित्व संपुष्टात आल्यानंतर विधानसभेतील समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी चिंता व्यक्त करत महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांना पत्र लिहिलं आहे. शेख यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना लिहिलेल्या पत्रात भविष्यात महाविकास आघाडीने मुस्लीम समाजाला योग्य प्रतिनिधित्व द्यावं, अशी मागणीही केली आहे.विधानपरिषदेतील जागांचा आकडा किती?महाराष्ट्रात १९३७ पासून विधानसभा आणि विधानपरिषद ही दोन सभागृहे आहेत. स्थापनेपासून महाराष्ट्र विधानपरिषदेत मुस्लीम समाजाचं काही ना काही प्रतिनिधित्व राहिलं आहे. मात्र यंदा प्रथमच मुस्लीम आमदारांची संख्या शून्यावर आली. विधानपरिषदेच्या एकूण ७८ जागा असून काही जागा रिक्त असल्याने या सभागृहात सध्या ५१ आमदार आहेत.रईस शेख यांनी लिहिलेल्या पत्रात नेमकं काय म्हटलंय? महाराष्ट्राच्या विधान परिषदेला शंभर वर्षाची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. राज्यात ११.५६ टक्के मुस्लीम लोकसंख्या आहे. मात्रविधान परिषदेतमुस्लीम प्रतिनिधित्व आजपर्यंत अत्यंत अल्प राहिलेले आहे. २७ जुलै २०२४ रोजी



राष्ट्रवादी काँग्रेसचे बाबाजानी दुर्राणी आणि काँग्रेसचे मिर्झा वजाहत निवृत्त होत आहेत. त्यामुळे विधान परिषदेत असलेले मुस्लीम प्रतिनिधित्व आता संपुष्टात येणार आहे. १९३७ मध्ये राज्यात द्वी- सभागृह पद्धती अस्तित्वात आली. तेव्हापासून आजपर्यंत या ज्येष्ठ सभागृहात मुस्लीम प्रतिनिधित्व कायम राहिलेले आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याच्या ज्येष्ठ सभागृहात मुस्लीम प्रतिनिधित्व संपुष्टात येणे हे काही शोभणारे नाही. राज्यात १४ लोकसभा मतदारसंघात मुस्लिम बहुल मतदार असतानाही नुकत्याच संपलेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने एकही मुस्लिम उमेदवार दिला नव्हता. राज्य अस्तित्वात आल्यापासून म्हणजे १९६० पासून महाराष्ट्रातून ५६७ खासदार निवडून गेले, त्यामध्ये मुस्लिम समाजाला अवघे १५ (२.५ टक्के) इतके अल्प प्रतिनिधित्व लाभले आहे. विधानसभेत आज अवघे १० मुस्लीम सदस्य आहेत. राज्याच्या ११ कोटी लोकसंख्येमध्ये १० पैकी एक मुस्लीम मतदार असतानाही मुस्लीम प्रतिनिधत्वाची राज्य विधानसभेत इतकी विदारक स्थिती आहे, अशा शब्दांत रईस शेख यांनी आपली खंत व्यक्त केली आहे. दरम्यान, मविआ नेत्यांना लिहिलेल्या पत्रात रईस शेख यांनी पुढे म्हटलं आहे की, विधान परिषदेचे ११ सदस्य २७ जुलै रोजी निवृत्त होत आहेत. त्यातील एकही जागा महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी मुस्लीम समाजाला दिलेली नाही. त्या पार्श्वभूमीवर विधान परिषदेच्या आगामी रिक्त जागा भरताना महाविकास आघाडीने मुस्लीम समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व देऊन आपली चूक सुधारायला हवी. मुस्लीम समाजाला राजकीय प्रतिनिधित्व नाकारून महाविकास आघाडी मुस्लीम मताचे ध्रुवीकरण करण्यात हातभार लावणार्‍या एएमआयएमसारख्या पक्षाकडे मुस्लीम समाजाला ढकलत आहे. म्हणून विधान परिषदेत मुस्लीम समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व द्यावे, अशी आघाडीच्या नेत्यांकडे आग्रही मागणी आहे. त्यास आपण योग्य प्रतिसाद द्याल, अशी अपेक्षा आहे.

# श्री.गणेश मंदिरामुळे कुरोलीच्या वैभवात भर : विठ्ठलस्वामी महाराज

**वडूज :** खटाव तालुक्यातील सिध्देश्वर कुरोली गावास मोठा धार्मिक संस्कृतीचा वारसा आहे.या गावात जागृत शिवमंदिर तसेच परमहंस यशवंत बाबा आश्रम ही दोन पवित्र देवालये आहेत. याच पंक्तीत आता नूतन गणेश मंदिराचा समावेश झाल्याने गावच्या वैभवात भर पडली आहे.असे मत वडगाव येथील जयराम स्वामी मठाचे मठाधिपती विठ्ठल स्वामी महाराज यांनी व्यक्त केले.

नूतन मंदिरात मूर्ती प्राण प्रतिष्ठापना व कलशारोहण विठ्ठल स्वामी यांच्या हस्ते पार पडल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मूर्ती प्रतिष्ठापने अगोदर पुण्याहवाचन , मूर्ती व कलशाची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर सकाळी वेदशास्त्री राजेंद्र वाडेकर, ह . भ. प. अभिषेक जोशी, शिरीष जोशी यांनी पौरोहित्य केले. या दरम्यान वडूज, कुरोली, धकटवाडी येथील भजनी मंडळांची सुश्राव्य भजने तसेच दुपारी ह.भ.प.विलास गरवारे यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. सांयकाळी वडूज येथील संत ज्ञानेश्वर भजनी मंडळांची सुश्राव्य भजने झाली . संपूर्ण दिवसभर उपस्थित सर्व भाविक-भक्तांना राज्य कर अधिकारी डॉ. किर्तीराज जाधव यांच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आले.

प्रतापराव देशमुख, शशिकला देशमुख, अमृतराव देशमुख, प्रसन्ना देशमुख, मनोज देशमुख, अमित देशमुख यांनी स्वागत केले. मान्यवरांची भेट

खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी आमदार प्रभाकर घार्गे, निवृत्त आयुक्त प्रभाकर देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिलभाऊ देसाई, काँग्रेसचे राज्य सचिव रणजितभैय्या देशमुख, माझी सभापती संदीप मांडवे, प्रा. कविता म्हेत्रे, डॉ. प्रियांका माने,पृथ्वीराज गोडसे, डॉ. महेश माने, धनंजय क्षीरसागर,धर्माजी मांडवे, ॲड.शिवाजीराव जाधव,डॉ. विवेक देशमुख, राजाराम देशमुख, विजय शेटे,पांडुरंग भोईटे, चंद्रसेन देशमुख,अंकुश पांडोळे, सोमनाथ साठे, सुनिल मिसाळ आदीसह शेकडो मान्यवरानी भेट देवून संयोजकांचे कौतुक केले.

# ड्रग्ज विरोधात सरकार ॲक्शन मोडवर

## अवघ्या पाच महिन्यात ६५२९ कारवाया : ४ हजार कोटींचा माल जप्त; ६ पोलीस बडतर्फ

**मुंबई :** राज्यात तरूणपिढी ड्रग्ज विळख्यात सापडली आहे. ड्रग्ज माफियांचा बिमोड करण्यासाठी राज्य सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. या पार्श्वभूमीवर अंमली पदार्थ विरोधी पथकांनी कारवाईचा धडाका सुरू केला. त्यानुसार अवघ्या पाच महिन्यात ६५२९ कारवाया केल्या असून ४ हजार १३१ कोटींचा माल जप्त केला. तसेच ड्रग्ज माफियांना संगनमत करणाऱ्या सहा पोलीसांना बडतर्फ केल्याची माहिती गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

आमदार भाई जगताप यांनी तारांकित प्रश्नाद्वारे मुंबईसह राज्यातील वाढत्या ड्रग्ज विक्रीच्या घटनांकडे लक्ष वेधले. सरकारने ड्रग्ज विक्रीला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, बाबत खुलासा करावा, अशी मागणी केली. फडणवीस यांनी या प्रश्नांवर उत्तर दिले.

राज्यात अंमली पदार्थांचे मोठे आव्हान उभे असून चिंतेचा विषय बनला आहे. केंद्र सरकारने सर्व राज्यांच्या गृहमंत्र्यांना 'संयुक्त कृती आराखडा' सादर केला. सध्या ड्रग्ज विक्रीचे विविध केंद्र देशभरात सुरू आहेत. कुरीअर मार्फत, इस्ट्राग्राम, फेसबूक चॅट किंवा अन्य मॅसेंजरच्या माध्यामातून विक्री होत असल्याचे समोर आले आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होणारी विक्रीही मोठे आव्हान बनले आहे. त्यामुळे एक शून्य सहनशीलता धोरण शासनाने हाती घेतले आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी पथक नेमले आहेत. सर्वांची एकत्रित बैठक घेऊन, सविस्तर अहवाल राज्य सरकार आणि केंद्र सरकारला पाठवावा, अशी सक्ती केली आहे. समुद्र किनारची बंदरे असो किंवा अन्य ठिकाणीच्या वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी डॅग्ज स्कॅनर लावले आहेत. त्यामुळे कोणत्या कंटेनरमध्ये कुठलाही अमली पदार्थ शोधण्यास मदत होईल. तसेच तंत्रज्ञानाद्वारे नवीन विक्री केंद्र कशाप्रकारे संपवता येतील, यासाठीही सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय फॉरवर्ड लिंकेज आणि बॅकवर्ड लिंकेज शोधण्यासाठी पुढाकार घेतला आहे. एका प्रकरणाची लिंक उत्तराखंडला मिळाली. तेथील पोलिसांची समन्वयाचा साधून कारवाई सुरू केल्याची माहिती फडणवीस यांनी म्हटले.

**६ हजार कारवाया; ४१३१ कोटींचा माल जप्त**

सन २०२३ मध्ये मुंबईत ४ कोटी रुपयांचा माल पकडला होता. तर संपूर्ण महाराष्ट्रात मागील वर्षी १२ हजार ६४८ कारवाया केल्या. त्यात ८९७ कोटी रुपयांचा माल मिळाला होता. यंदा जानेवारी ते मे महिन्यापर्यंत ६ हजार ५२९ कारवाया केल्या आहेत. यात ४ हजार १३१ कोटी रुपयांचा माल जप्त केल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच या सगळ्या प्रकारात पोलिसांचा सहभाग असल्यास तातडीने त्यांना बडतर्फ करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार यापूर्वी ६ पोलिसांना बडतर्फ केल्याचे फडणवीस यांनी परिषदेत स्पष्ट केले.

**पोस्ट ऑफिस, कुरीयर कंपनीला सूचना**

**कुरियर कंपन्या आणि भारतीय पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून ड्रग्ज विक्रीला प्रतिबंध घालण्यासाठी कंबर कसली आहे. प्रत्येक कुरीयर कंपन्या आणि पोस्ट ऑफिसना भेटी दिल्या आहेत. दरम्यान, ड्रग्ज विक्रीवर कशा प्रकारे बंधन घालता येतील, याबाबत सूचना दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले.**

# सरकारी शाळांचा दर्जा सुधारा, मग पोरं दुसऱ्या शाळेत जाणार नाही; हायकोर्टाने राज्य सरकारचे उपटले कान

**मुंबई:** आधी सरकारी शाळांचा दर्जा सुधारा मग पोरं दुसऱ्या शाळेत जाणार नाहीत, या शब्दांत हायकोर्टानं गुरुवारी राज्य सरकारचे कान उपटलेत. आरटीई प्रवेशातून खाजगी विनाअनुदानित शाळा वगळण्याचा निर्णय कसा योग्य आहे? हे हायकोर्टाला पटवून देणाऱ्या राज्य सरकारला हायकोर्टानं चांगलंच धारेवर धरलं. आरटीई प्रवेशातून खाजगी विनाअनुदानित शाळांना वगळणाऱ्या ९ फेब्रुवारीच्या परिपत्रकाविरोधात दाखल याचिकांवर सुनावणी पूर्ण करत गुरूवारी हायकोर्टानं आपला निकाल राखून ठेवला.

या परिपत्रकाला हायकोर्टानं मे महिन्यात स्थगिती दिली आहे. त्यामुळे आरटीईचे प्रवेश सध्या खोळंबले आहेत, तेव्हा यावर तातडीनं सुनावणी घ्यावी, अशी विनंती सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी कोर्टाकडे केली. ती मान्य करत हायकोर्टानं दिवसभर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून यावरील निर्णय राखून ठेवला. या परिपत्रकाचं समर्थन करणारे अर्ज खासगी विनाअनुदानित शाळांनी दाखल केले. खंडपीठासमोर यावर एकत्रित सुनावणी झाली. फेब्रुवारी महिन्यात परिपत्रक जारी झालं. मे महिन्यात या परिपत्रकाला स्थगिती देण्यात आली. या काळात आम्ही अन्य विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेत. आता हे प्रवेश बाधित करु नये, अशी विनंती खाजगी शाळांनी हायकोर्टाकडे केलीय.

समाजातील वंचित व आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद कायद्यात आहे. मात्र सरकारी शाळेपासून एक किमी अंतरावर असलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना तुम्ही या तरतुदीतून वगळलंत. याचा अर्थ एखाद्या गरीब मुलाला इंग्रजी शाळेत शिक्षण घेण्याची इच्छा असली तरी तो तिथं प्रवेश घेऊ शकणार नाही, असे खडेबोल हायकोर्टानं राज्य शासनाला सुनावले.

याचिकाकर्त्यांचा दावा

शिक्षण मराठी की इंग्रजीतून घ्यायाचं हा अधिकार पालकांचा व विद्यार्थ्यांचा आहे. अचानक नवीन नियम करुन त्यावर गदा आणली जाऊ शकत नाही. आरटीई कायद्यात शाळेची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. शाळा म्हणजे सर्व प्रकारच्या शाळा असं त्यामध्ये नमूद केलेलं आहे. त्यामुळे मूळ कायद्यात बदल करण्याचा अधिकार केंद्र सरकारलाही नाही. सरकारी शाळेपासून एक किमी अंतरावर असलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना आरटीई प्रवेशातून वगळून सरकारनं कायद्याचा हेतूच नष्ट केला आहे. आरटीई प्रवेशामुळे सरकारी शाळांना गळती लागली हा राज्य सरकारचा दावा चुकीचा आहे. गेली अनेक वर्षे आरटीई प्रवेश सुरु आहेत. यात बदल करण्याची आवश्यकता नव्हती, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला.

**राज्य सरकारची भूमिका**

आरटीई प्रवेशासाठी राखीव असलेल्या जागांपेक्षा येणा-या अर्जांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललीय. सरकारी शाळेतील प्रवेश घटले आहेत. सरकारी शाळेत शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. शिक्षणासाठी राज्य सरकार कोट्यवधी रुपये खर्च करतय. त्यामुळे प्रवेशाचा समतोल राखण्यासाठीच हा नवीन नियम केला आहे. आरटीई प्रवेशात आठवीपर्यंतच्या शिक्षणाचा खर्च राज्य सरकार करतंय. पुढे खासगी शाळेतील नववी, दहावीचा खर्च गरीब कुटुंबाला परवडणारा नसतो. खासगी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. त्यासाठी स्वतंत्र शुल्क आकारले जातं. हे शुल्क न भरल्यानं मुलाला विविध उपक्रमात सहभागी होता येत नाही. ज्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचं खच्चीकरण होतं. तसेच आरटीईतून खाजगी शाळांना पूर्णतः वगळलेले नाही. नोंदणी प्रक्रियेत इंग्रजी व मराठी अशा दोन्ही शाळांचा पर्याय देण्यात आला आहे, असा दावा राज्य सरकारनं हायकोर्टात केला आहे.

# लोकराज्य सरकारी कर्मचाऱ्यांना शिंदे सरकारकडून 'गिफ्ट'; महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ



**मुंबई :** राज्यातील शिंदे सरकारने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. सातव्या वेतन आयोगानुसार, सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४६ वरून ५० टक्के करण्यात आला आहे.

राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार, १ जानेवारी २०२४ ते ३० जून २०२४ या कालावधीतील थकबाकीसह जुलै २०२४ च्या वेतनाबरोबर वाढीव महागाई भत्ता रोखीने देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महागाई भत्ता वर्षभरातून दोनदा वाढत असतो. १ जानेवारी आणि १ जुलै. मात्र, निर्णय उशिरा घेतला जातो.

बुधवारी काढलेल्या शासन निर्णयात १ जुलैपासून चार टक्के महागाई भत्त्यात वाढ केली आहे. शासकीय, निमशासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी या सगळ्यांना हा महागाई भत्ता मिळणार आहे.

# भोरच्या वडगाव डाळ येथे रानडुक्करांचा हैदोस

**भोर :** भोर-शिरवळ मार्गावरील वडगाव डाळ (ता.भोर ) येथे रानडुक्करांच्या तीन ते चार कळपांनी बहुतांशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊस पिकात धुडगूस घालून ऊस खाल्ल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.यामुळे ऊस उत्पादक शेतकरी हवालदील झाले आहेत.

वडगाव डाळ येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची शेती डोंगर रांगांच्या शेजारी असल्याने दरवर्षी लहान मोठ्या २५ ते ३० रानडुक्करांच्या समूहाचे दोन- तीन कळप शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे नुकसान करीत असतात.रब्बी हंगामात उन्हाळी भुईमूग तसेच बागायती शेती तर खरिपात भात व ऊस शेतीचे नुकसान होत असते. रानडुक्कर करीत असलेल्या शेती पिकांचे नुकसानीने शेतकरी हवालदील झाले आहेत.

सध्या ऊस पिक जोमात येऊ लागले असताना रानडुक्करांनी जननी शिवारातील संदीप विठ्ठल गायकवाड ,नामदेव जगन्नाथ गायकवाड, रमेश गणपत गायकवाड ,सोपान जगन्नाथ गायकवाड,जालिंदर दशरथ चौधरी या शेतकऱ्यांच्या ऊस पिकात मागील आठवड्यापासून धुडगूस घातला आहे.शेतकऱ्याचे प्रत्येकी ३० ते ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. शेती पीक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वन विभागाने तात्काळ नुकसानीची भरपाई द्यावी अशी मागणी परिसरातील शेतकरी गटांकडून होत आहे. वडगाव डाळच्या डोंगर भागात रानडुक्करांची संख्या वाढलेली आहे.शिवारात रात्रीची गस्त घालूनही रानडुकरांचे कळप शेतातील पिकांमध्ये येऊन नुकसान करीत आहेत. वनविभागाने तात्काळ रानडुक्करांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरू लागली आहे.

# माझं कविताच गाव संकल्पनेतून काव्य निर्मितेला चालना मिळेल : संजय इंगवले

**पाटण :** माझं कविताच गाव या संकल्पनेमुळे वाचन संस्कृतीला प्रेरणा व बळकटी मिळते तसेच कवी साहित्यिक यांच्या लिखाणाला व काव्य साहित्य नवनिर्मितेला चालना व प्रोत्साहन मिळते असे प्रतिपादन पुणे विभागीय ग्रंथालय संघांचे राज्य संचालक संजय इंगवले यांनी मल्हारपेठ येथे केले माझं कविताच गाव जकातवाडी राजधानी सातारा पुरस्कृत माझं कविताच गाव पाटण तालुका कार्यकारणी चा पदग्रहण समारंभ व खुले कवी संमेलन असा संयुक्तिक कार्यक्रम सहयाद्री वाचनालय मल्हारपेठ येथे झाला यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संजय इंगवले बोलत होते या समारंभचे उदघाटन मल्हारपेठ चे सरपंच किरण दशवंत उपसरपंच पुरषोत्तम चव्हाण तसेच ग्रंथालय भारती चे राष्ट्रीय सचिव विश्वास नेरकर यांनी केले यावेळी डॉ उदय वनारसे प्रल्हाद पारटे



सुषमा आलेकरी वसुंधरा निकम गणेश शेंडे संजय शेटे स्मिता शेटे आदी मान्यवर उपस्थित होते

यावेळी विश्वास नेरकर यांनी सांगितले कि काव्य निर्मितीतून तसेच साहित्य निर्मितेतून समाज प्रबोधन व समाज परिवर्तन होऊन प्रत्येक गावागावात साहित्य जागृती व समाज जागृती झाली पाहिजे

प्रल्हाद पारटे यांनी सांगितले कि प्रत्येक गाव हे माझं कविताच गाव करायचे असेल तर समाजातील सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रात जनजागृती तसेच प्रत्येक्षात कृती झाली पाहिजे

यावेळी माझं कविताच गाव जकातवाडी राजधानी सातारा पुरस्कृत पाटण तालुका कवी समूह कार्यकारणी चा पदग्रहण सोहळा संपन्न झाला.

यामध्ये पाटण तालुका अध्यक्ष दादासाहेब पवार उपाध्यक्षा विजयमाला म्हासुर्णेकर उपाध्यक्ष दादा सावंत सचिव सूर्यकांत शिंदे सहसचिव तानाजी साळुंखे कार्याध्यक्ष उमेश सुतार तसेच पाटण तालुका कार्यकारणी संचालक म्हणून कवी सर्वश्री विजय कदम अनिल बोधे खाशाबा चव्हाण शांताराम सुतार प्रतीक पवार विद्या नारकर म्हासुर्णेकर व नेहा गायकवाड यांनी पदग्रहण केले सर्व पदाधिकारी संचालक यांना मान्यवर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आली

यावेळी आयोजित केलेल्या कवी संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला सातारा जिल्ह्यातून तीस कवी कवियत्री सहभागी झाले होते.

या कवी संमेलन चे सूत्रसंचालन कवियत्री जयश्री माजगावकर यांनी केले यावेळी उपस्थित कवींनी वास्तवतेला स्पर्श करणाऱ्या व समाज प्रबोधन व समाज परिवर्तन करणाऱ्या तसेच भक्ती मार्ग दाखविणाऱ्या समाज मनाला भावतील अशा कविताचे उत्कृष्ट सादरीकरण केले सर्व कवींना आकर्षक सन्मानपत्रही मान्यवर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

# नारायणगाव इनरव्हील क्लबचा डिस्ट्रिक्ट ३१३ कडून विशेष सन्मान

**नारायणगाव :- (सा.वा.)** इनरव्हील क्लब नारायणगांव यांचा डिस्ट्रिक्ट ३१३ कडून नुकताच सन्मान चिन्ह देवून विशेष सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम पनवेल या ठिकाणी उत्साहात पार पडला.

इनरव्हील क्लब नारायणगाव यांना चांगल्या कामाची पावती मिळाली असल्याची भावना क्लब च्या अध्यक्ष प्रीती शहा यांनी व्यक्त केली.

वर्षभरात ज्येष्ठ नागरिक, अनाथ मुले, महिलांसाठी विविध कार्यक्रम, वृक्षारोपण,आरोग्य शिबीर, हॅपी स्कूल या सारखे अनेक उपक्रम केल्याबद्दल हा सन्मान करण्यात आला. तसेच क्लबच्या जेष्ठ मार्गदर्शक व आयएसओ पदाधिकारी अंजली खैरे यांना बेस्ट आयएसओ हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. या कार्यक्रमास सविता खैरे, सुजाता भुजबळ, रश्मी थोरवे, ज्योती सोमवंशी , रूपाली शहाणे, नंदा मुथ्था, सुषमा वाजगे, दर्शना फुलसुंदर, रुचिता वाघ , सुनीता कोल्हे या सदस्या उपस्थित होत्या .

# गणपतराव पाटील यांच्या पॅनेलला दत्तवाडकरांचा एकमुखी पाठिंबा

## श्री गुरुदत्तचे संचालक बबनराव चौगुले यांची ग्वाही

**शिरोळ :** स्वर्गीय सा. रे. पाटील यांच्या नंतर गणपतराव पाटील यांनी कारखाना अत्यंत चांगला चालविला आहे. इतिहासाची पाने निश्चितपणे उघडून पाहायला आणि तपासायला पाहिजेत. क्षारपडीमुळे तालुक्यातील २५ हजार एकर जमीन मृत झाल्याने शेतकऱ्यांची अवस्था ही मृता सारखीच झाली होती. याचबरोबर राष्ट्रीय संपत्तीचीही हानी होत होती. दादांनी ही जमीन क्षारपड करून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर निर्माण केले आहे. त्यामुळे गट, तट, पक्ष न बघता गणपतराव



पाटील यांच्या पॅनेलला आम्ही एकमुखी पाठिंबा देत आहोत. त्यांच्या विजयाची जबाबदारी दत्तवाडकरांनी घेतली असून आम्ही त्यांच्या पाठीशी ठाम राहू, अशी ग्वाही श्री गुरुदत्तचे संचालक बबनराव चौगुले यांनी दिली.

दतवाड (ता. शिरोळ) येथे श्री दत्त कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या निमित्ताने आयोजित सत्तारूढ पॅनेलच्या संवाद दौऱ्यात ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बबनराव मोटे हे होते.

यावेळी बोलताना राजगोंडा पाटील म्हणाले, देशांमध्ये दत्त कारखाना अभिनय प्रयोग राबवण्यांबरोबरच नवीन तंत्रज्ञान सुद्धा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत आहे. यामुळे लोकांच्या प्रगतीत आणि उन्नतीमध्ये कारखान्याचा मोठा वाटा आहे. निवडणूक बिनविरोध व्हावी अशीच सर्वांची इच्छा आहे. एन. एस. पाटील यांनी दत्त कारखान्याचा व्यवहार आणि कारभार चांगला चालला असून विरोधाची शक्यता मोडून काढली पाहिजे आणि गणपतराव पाटील यांच्या पॅनेलला एक मताने निवडून दिले पाहिजे असे सांगितले. देवेंद्र सूर्यवंशी, अशोक निर्मळे, सरपंच चंद्रकांत कांबळे यांनीही मनोगततून आपल्या भावना व्यक्त केल्या.

गणपतराव पाटील यांनी सभासदांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांचे हित जोपासण्यासाठी कारखाना चांगल्या पद्धतीने चालवण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. त्यामुळे सभासदांच्या विश्वासावर आणि पाठिंब्यावर पुन्हा एकदा आम्हाला संधी मिळेल असा विश्वास व्यक्त केला. तसेच कारखान्याच्या ऊस विकास योजनांचा आणि श्री दत्त उद्योग समूहाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा त्यांनी संपूर्ण आढावा घेतला.

सूत्रसंचालन चंद्रशेखर कलगी यांनी केले. यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अरुणकुमार देसाई, महेंद्र बागे, अण्णासाहेब पाटील, सुरेशराव दळवी, डी. एन. सिदनाळे, बी. वाय. शिंदे, जयपाल सिदनाळे, कुमार आडे, बाबुराव पोवार, मलगोंडा पाटील, रावसाहेब पाटील, अशोक पाटील, राजू पाटील, एन. एस. पाटील, विवेक चौगुले, सर्जेराव सोळसे, सुनील कांबळे, मिनाज जमादार यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोग एकीकडे आणि इलाज तिसरीकडे..!

## अन्न औषध प्रशासनाचा कारभार ; सामाजिक संस्था आंदोलनाच्या तयारीत

**कुरुंदवाड :** कर्नाटक - महाराष्ट्रापासून ते दिल्लीपर्यंत कनेक्शन असणाऱ्या दूध पावडरच्या काळाबाजारवर अन्न औषध प्रशासनाने गांधारीची भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. कर्नाटक राज्यातील कागवाड पोलिसांनी जयसिंगपूर शहरात येणारी दूध पावडरीवर कारवाई केल्यानंतर अन्न औषध प्रशासनाला तब्बल १५ दिवसानंतरच जाग आली. आणि जयसिंगपूर व टाकवडे येथील गोडावूनवर छापा न टाकता तालुक्यातील इतर गावात तपासणी करून कारवाईच्या नावाखाली तोंडावर हात पुसण्याचा प्रकार केला आहे. त्यामुळे 'रोग एकीकडे आणि इलाज तिसरीकडे' असाच प्रकार अन्न औषध प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्याने काही सामाजिक संस्था या विरोधात पुणे आयुक्त कार्यालयाकडे तक्रार करून आंदोलन करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

शिरोळ तालुक्यात कर्नाटक राज्यातून येणारी दूध पावडर गेल्या अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणात येते. जयसिंगपूर येथील एका पेट्रोल पंपाच्या मागे असणाऱ्या गोडाऊनमध्ये त्या दूध पावडरचा काळाबाजार चालतो आणि तेथून ही पावडर २५ किलोच्या बॅगमध्ये पॅकिंग करून थेट दिल्लीला पाठवले जात असल्याचे कागवाड पोलिसांच्या कारवाईनंतर समोर आले होते. कर्नाटक राज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना नंदिनी दूध पावडर दिली जाते. मात्र, विद्यार्थ्यांच्या तोंडातला घास काढून घेऊन काही काळाबाजार करणाऱ्यांनी थेट ही पावडर जयसिंगपूर ते नवी दिल्ली पर्यंत पाठवण्याचे धाडस करीत असल्याची चर्चा आजही सुरू आहे.

दरम्यान अन्न औषध प्रशासन देखील कानाडोळा करत असल्याने यामध्ये 'अर्थपूर्ण' घडामोडी घडल्याची चर्चा शिरोळ तालुक्यात सुरू असून गेल्या काही दिवसापूर्वी अन्न औषध प्रशासनाने गोडाऊनच्या ठिकाणी धाड टाकता तालुक्यातील अगदी लहान व्यापाऱ्यांच्या दुग्धजन्य पदार्थांचे नमुने घेऊन कारवाईच्या नावाखाली तोंडावर हात पुसण्याचा प्रकार केला आहे.

कागवाड पोलिसांनी बेकायदेशीररित्या कर्नाटकातून महाराष्ट्र आणल्या जाणाऱ्या नंदिनी दूध पावडरच्या वाहनांच्या वर कारवाई केल्याने काही दिवस दूध पावडरचा अवैध व्यवसाय करणारे गप्प बसले होते मात्र काही अवधीनंतर सर्वकाही शांत झाले आहे असे समजून पुन्हा एकदा जोमाने बेकायदेशीर रित्या दूर पावडर ची वाहतूक करण्याच्या तयारीत असल्याचे समजते

# बजेट पुरवणीतून शिरोळ तालुक्याला १९५ कोटींचा निधी

**आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांची माहिती**

**शिरोळ :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने अर्थसंकल्प पुरवणी मागणीतून प्रादेशिक मनोरुग्णालयासाठी १५० कोटी, शिरोळ तालुक्यातील रस्ते, तलाठी कार्यालय, मराठा समाज हॉल, जिल्हा मार्ग व राज्य मार्ग यासह विविध विकास कामांसाठी राज्य शासनाने १९५ कोटींच्या निधीला तत्काळ मंजुरी दिली असून लवकरच या कामांची निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणार असल्याची माहिती आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली.

नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्प पुरवणी मागणीतून उदगाव येथील प्रादेशिक मनोरुग्णालयासाठी १५० कोटी, शिरोळ तालुक्यातील प्रामा क्रं.६ पासून अतिग्रे - कबनूर - इचलकरंजी - टाकवडे - शिरढोण - मजरेवाडी - अकिवाट - टाकळी - खिद्रापूर या मार्गाच्या मजबुतीकरणासह सुधारणा करणेकामी ३ कोटींचा निधी, प्रामा क्रं.६ पासून अतिग्रे - कबनूर - इचलकरंजी - टाकवडे - शिरढोण - अकिवाट - टाकळी - खिद्रापूर रस्ता, आर.सी.सी. गटर्सचे बांधकाम करणेसाठी ८० लाख, निढोरी - गोरंबे - कागल - सांगाव - यळगुड - शिरदवाड -अब्दुललाट - हेरवाड रस्ता रुंदीकरणासह सुधारणा करणे कामी ५ कोटी, प्रामा क्रं.६ पासून अतिग्रे - कबनूर इचलकरंजी - टाकवडे - मजरेवाडी अकिवाट - टाकळी - खिद्रापूर मध्ये आर.सी.सी. गटर्सचे बांधकाम करणे २ कोटी यासह प्रमुख जिल्हा मार्गासाठी शिरोळ तालुक्यातील रामा क्रं. १५३ पासून कुरुंदवाड नांदणी ते प्रामा क्र. ६ पर्यंत प्रजिमा क्र. ७३ चे मजबुतीकरणासह सुधारणा करणे यामध्ये कुरुंदवाड ते नांदणी पुल - दीड कोटी, कबनूर - गंगानगर - यड्राव - जांभळी - हरोली - नांदणी - धरणगुत्ती - शिरोळ रस्ता प्रजिमा क्रं. ३१ यामधील नांदणी ते धरणगुत्ती रस्ता रुंदीकरणासह मजबुतीकरण करण्यासाठी २ कोटी ७० लाखांचा निधी मंजूर झाला आहे.

याचबरोबर शिरोळ तालुक्यातील १९ तलाठी कार्यालय आणि १ मंडल अधिकारी कार्यालयासाठी प्रत्येकी १५ लाख असे ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामध्ये दत्तवाड, जुने व नवे दानवाड, सैनिक टाकळी, राजापूर - खिद्रापूर, नांदणी, धरणगुत्ती, हरोली, चिपरी - कोंडीग्रे, शिरढोण, यड्राव, कवठेगुलंद, औरवाड -गौरवाड, जैनापूर, कवठेसार, मजरेवाडी, बस्तवाड, शिरोळ - आगर, अकिवाट, जयसिंगपूर, जयसिंगपूर मंडळ अधिकारी कार्यालय या गावांचा समावेश आहे. महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत वारणा मोठे प्रकल्पाच्या कामांना प्रशासकीय मान्यता झाली असून कोथळी समडोळी बंधाऱ्याच्या मजबुतीकरणासाठी ७ कोटी रुपये, वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत कुरुंदवाड शिरोळ आणि जयसिंगपूर शहराच्या विकासासाठी १७ कोटी यामध्ये

जयसिंगपूरमध्ये विविध विकास कामे करणे करिता १२. ३५ कोटी, शिरोळ मधील विविध विकास कामांकरिता - २.१५ कोटी,

कुरुंदवाड शहरातील मराठा समाजातील सांस्कृतिक हॉल बांधण्यासाठी २ कोटी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत 'ब' वर्ग दर्जा प्राप्त श्री अतिशय क्षेत्र नांदणी ऋषीभाचल (निशिदिका) येथे यात्री निवास बांधणे, स्वाध्याय हॉल, भोजनगृह बांधणे, संरक्षित भिंत बांधणे यासाठी २ कोटी ५० लाखांचा निधी असा एकूण शिरोळ तालुक्याच्या विकासासाठी १९५ कोटी रुपयांच्या पुरवणी निधीला मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.